**प्रकल्प प्रवर्तक मेसर्स भैरवनाथ शुगर वर्क्स लिमिटेड, गट नं. ६२, ६३, ६५, ६६, ६८, ६९, मुक्काम पोस्ट – सोनारी आणि गट नं. ३७, ३८, ३९ व ४० मौजे मुगाव, तालुका-परांडा, जिल्हा – उस्मानाबाद, महाराष्ट्र यांच्या मळीवर/उसाच्या रसावर आधारित कार्यरत आसवणी प्रकल्पाची क्षमता ३०.० किलोलिटर प्रतिदिन पासून ५९.० किलोलिटर प्रतिदिन विस्तारिकरण संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतचा इतिवृतांत**

-------------

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स भैरवनाथ शुगर वर्क्स लिमिटेड, गट नं. ६२, ६३, ६५, ६६, ६८, ६९, मुक्काम पोस्ट – सोनारी आणि गट नं. ३७, ३८, ३९ व ४० मौजे मुगाव, तालुका-परांडा, जिल्हा – उस्मानाबाद, महाराष्ट्र यांच्या मळीवर/उसाच्या रसावर आधारित कार्यरत आसवणी प्रकल्पाची क्षमता ३०.० किलोलिटर प्रतिदिन पासून ५९.० किलोलिटर प्रतिदिन विस्तारिकरण संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी वार – बुधवार, दिनांक १७ मार्च, २०२१ रोजी दुपारी ११.३० वाजता प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यात आलेली होती.

भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार, सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई - १८ ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२१०२२२ एफटीएस-०२५३ दिनांक २२-०२-२०२१ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती गठित केली:-

| | |
|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, उस्मानाबाद<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - **अध्यक्ष** |
| २) प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगबाद<br>(महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी) | - **सदस्य** |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>लातूर | - **समन्वयक** |

श्री व्ही. पी. शेळके, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, लातूर तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी सांगितले की कोविडच्या पार्श्वभूमीमुळे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी दिलेल्या निर्देशांनुसार ही प्रत्यक्ष लोकसुनावणी (Physical Public Hearing) आयोजित करण्यात आलेली असून बैठकीच्या सत्रात ५० व्यक्तींना परवानगी देण्यात आलेली असून जर उपस्थितांची संख्या जास्त असल्यास व्यक्तींना पुढील सत्रात बैठकीत संधी देण्यात येईल. सर्व उपस्थितांना जनसुनावणीत सहभागाची संधि देण्यात येईल असे सांगितले. त्यांनी उपस्थितांना कोविडच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारच्या निर्देशांचे पालन करण्याची सूचना केली. त्यानुसार, प्रत्येक व्यक्तिचे शारीरीक तापमान तपासणे, सॅनिटायझरचा वापर सभागृहात प्रवेश करताना करण्यात आलेला आहे. बैठकीत प्रत्येक व्यक्तीने मुखपट्टी (मास्क) घालणे व दोन व्यक्तींमध्ये सामाजिक अंतर ठेवण्याची सूचना केली.

समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी श्री शिवकुमार स्वामी, अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, उस्मानाबाद तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती, डॉ. पी. एम. जोशी, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, औरंगाबाद तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी, पत्रकार, पर्यावरण प्रेमी, स्वयंसेवी संघटना व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी असे सांगितले की पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यापुर्वी पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. श्री शेळके यांनी असे सांगितले की अधिसूचनेनुसार ३८ -३९ उद्योगांचा त्यात समावेश असून त्यात मळीवर आधारित आसवणी प्रकल्पाचा समावेश आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांना प्रकल्प प्रवर्तक प्रकल्प प्रवर्तक मेसर्स भैरवनाथ शुगर वर्क्स लिमिटेड, गट नं. ६२, ६३, ६५, ६६, ६८, ६९, मुक्काम पोस्ट – सोनारी आणि गट नं. ३७, ३८, ३९ व ४० मौजे मुगाव, तालुका-परांडा, जिल्हा – उस्मानाबाद, महाराष्ट्र यांच्या मळीवर/उसाच्या रसावर आधारित कार्यरत आसवणी प्रकल्पाची क्षमता ३०.० किलोलिटर प्रतिदिन पासून ५९.० किलोलिटर प्रतिदिन विस्तारिकरण संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी आयोजित

करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला. भारत सरकार यांच्या ईआयए अधिसूचनेनुसार प्रस्तावित प्रकल्प हा संवर्ग ब ५ (जी) i & ii मध्ये वर्गीकृत आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई यांना पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्याची परवानगी मागितली व सदरहू विभागाने दिनांक २४-०२-२०२० रोजी त्यास मान्यता (अटी व शर्ती – Terms of Reference) देण्यात आली.

सदरहू जनसुनावणी ही आज दिनांक १७-०३-२०२१ रोजी आयोजित करण्यास जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी मान्यता दिलेली आहे, त्यानुसार पर्यावरण अधिसुचनेनुसार ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक सकाळ यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र टाइम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रात इंग्रजीत दिनांक ११-०२-२०२१ रोजी पर्यावरण विषयक जाहीर जनसूनावणी सूचना प्रकाशित करण्यात आलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याप्रमाणे नियोजित विस्तार प्रकल्पाविषयीचा पर्यावरण मुल्यांकन आघाताची व कार्यकारी सारांश अहवालाची इंग्रजी व मराठी प्रत शासनाच्या अधिसूचित कार्यालयांमध्ये म्हणजे भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, विभागीय कार्यालय, पश्चिम-मध्य विभाग, न्यू, सेक्रेटरिएट बिल्डिंग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर – ४४० ००१, मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, उस्मानाबाद, तहसीलदार, तहसील कार्यालय- परंडा, तालुका – परंडा, जिल्हा – उस्मानाबाद,, ग्रामपंचायत कार्यालय-, सोनारी व मुगाव, तालुका-परंडा, जिल्हा – उस्मानाबाद, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद, उप प्रादेशिक अधिकारी, उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, लातूर आणि मप्रनि मंडळाच्या संकेत स्थळावर सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते. समन्वयक यांनी असे सांगितले की स्थानिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, लातूर यांना तेलंगणा राज्यातून तीन लेखी सूचना ईमेलव्दारे प्राप्त झालेल्या आहेत. समन्वयक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात. श्री शेळके यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी सुरु करण्याची विनंती मा. अध्यक्षांना केली.

त्यावेळी श्री शेळके यांनी प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांना सादरीकरणानंतर इमेलव्दारे प्राप्त झालेल्या तीन सूचनांचा परामर्श करण्याची सूचना केली..

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी सादरीकरण केले. त्यांनी सांगितले की पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार यांच्या ईआयए अधिसूचनेनुसार प्रस्तावित प्रकल्प हा संवर्ग ब ५ (जी) i & ii मध्ये वर्गीकृत आहे. सदरहू प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प असून सदरहू प्रकल्प विस्तारीकरणामुळे आसवणी प्रकल्पात अतिरिक्त मनुष्यबळाची आवश्यकता आहे. त्यांनी प्रकल्पातील पर्यावरण व्यवस्थापन योजनेची माहिती सादरीकरणात दिली.

सादरीकरणानंतर अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी उपस्थितांना त्यांच्या काही पर्यावरणविषयी आक्षेप, सूचना असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

१) **श्री नामदेव मधुकर भाग्यवंत, राहणार- डोंजा, तालुका – परंडा, जिल्हा—उस्मानाबादः-**

येथे आपण प्रकल्पाचे विस्तारिकरण करत आहोत. तर प्रकल्पात रोजगाराच्या निर्मितीत किती वाढ होणार आहे?

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की उपस्थितांनी चांगला प्रश्न विचारला आहे. प्रकल्पात आता ४३९ लोक कार्यरत असून विस्तारिकरणामुळे तांत्रिक १५ लोकांची प्रकल्पात प्रत्यक्ष गरज आहे. मात्र विस्तारिकरणामुळे अप्रत्यक्ष रोजगारात व स्थानिक व्यवसायात प्रचंड वाढ होऊन ३००-४०० व्यक्तींना रोजगार मिळेल उदा. ट्रक, टँकर वाहतुकीसाठी वाहन चालक, वडापावाची गाडी, चहाची टपरी, रिक्षा या स्थानिक व्यवसायात प्रचंड वाढ होईल.

२)**श्री विनोद लक्ष्मण दळवे, राहणार- मुगाव, तालुका – परंडा, जिल्हा-उस्मानाबादः-**

आपण प्रकल्पासाठी कच्चा माल म्हणून मोलॅसिस वापरतो. त्याऐवजी दुसरा पदार्थ आपण कच्चा माल म्हणून वापरु शकतो काय?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की साखर कारखाना आला की मोलॅसिस आले. पण मोलॅसिसऐवजी आपण धान्य वापरू शकतो. धान्य म्हणजे ज्वारी, मका वापरुन आपण अल्कोहोल करु शकतो. मात्र धान्य वापरुन त्याचे अल्कोहोलमध्ये रुपांतर करण्यासाठी खर्च हा मोलॅसिसपेक्षा खूप जास्त येतो. येथे आपण आपल्या कारखान्यातीलच मोलॅसिस/उस गाळप वापरणार आहोत. धान्य बाहेरुन आणावे लागेल. त्यामुळे त्याचा वाहतुकीचा खर्चही वाढेल. त्यामुळे अन्नापासून अल्कोहोल परवडणारे नाही.

३) **श्री संदिप सुभाष कवठे, राहणार-सोनारी, तालुका-परंडा, जिल्हा-उस्मानाबादः-**

प्रकल्पाचे विस्तारिकरण आपण हाती घेतलेले आहे. तर प्रदूषण होऊ नये म्हणून आपण झाडे लावणार आहेत काय किंवा झाडे लावलेली आहेत काय?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार उत्तर देत असताना सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती प्रश्न ज्याप्रकारे विचारला, तसेच उत्तर देण्याची सूचना केली. त्यावेळी पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की ३,००० झाडे आपण लावली असून प्रकल्पात अजून आपण १०,५०० झाडे लावणार आहोत.

४) **<u>श्री तुलसीदास अंबादास बालगुडे, राहणार-सोनारी, तालुका-परंडा, जिल्हा-उस्मानाबाद:-</u>**

आसवणी प्रकल्पाच्या विस्तारिकरणासाठी किती खर्च येईल व त्याचा आम्हां सभासदांना फटका बसू नये,

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की आसवणी विस्तारिकरणासाठी १३ कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात येणार आहे.

प्रकल्प प्रवर्तकांना श्री बालगुडे यांनी विस्तारिकरणाचा फटका बसेल काय ह्या शंकेस उत्तर देण्याची विनंती केली. त्यावेळी सदस्य, पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी येथे मत मांडले की हा प्रशासकीय विषय असून या बैठकीचा विषय नाही. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की पर्यावरणविषयक जनसुनावणी असून विस्तारिकरणामुळे पर्यावरणावर, आजूबाजूच्या परिसरत काय परिणाम होईल यासाठी आहे. त्याबाबत सूचना, आक्षेप नोंदवू शकता.

५) **<u>श्री हरिदास महादेव ढगे, राहणार-पिस्तमवाडी, तालुका – परांडा, जिल्हा-उस्मानाबाद:-</u>**

या प्रकल्पांतर्गत अन्य विकासयोजना राबवविता येतील काय?

यावेळी सदस्य, पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी प्रश्नाच्या विषयाबाबत स्पष्टीकरण देण्याची सूचना केली. त्यावेळी श्री ढगे यांनी विस्तारिकरणामुळे प्रकल्पात नोक-या मिळतील काय असे स्पष्टीकरण दिले. सदस्य, पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी विस्तारिकरणामुळे प्रत्यक्ष १५ व्यक्तींना नोक-या व अप्रत्यक्ष अनेक व्यक्तींना फायदा व स्थानिक व्यवसायात वाढ होईल, हॉटेल्स वाढतील, वाहतुकीच्या साधने वाढल्यामुळे लोकांना काम मिळेल असे उत्तर अगोदरच दिलेले आहे असे सांगितले.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की परिसरात कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी निधितंर्गत (Corporate Social Responsibility Fund) जलसंधारणासाठी २.५० कोटी रुपये खर्च करण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे वृक्ष लागवड, पिण्याच्या पाण्याची सोय केली जाईल.

६) **<u>श्री लक्ष्मण वसुदेव ढगे, राहणार-पिस्तमवाडी, तालुका - परंडा, जिल्हा-उस्मानाबाद:-</u>**

विस्तारिकरणानंतर साधारण हा प्रकल्प किती दिवस चालू ठेवण्यात येईल?

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की प्रकल्पात कंपोस्टींग करण्यात येणार आहे. सांडपाणी/स्पेंटवॉश जो तयार होईल, तो बायो-मिथिनायझेन, कॉन्सन्ट्रेशन आणि कंपोस्टींग करायचे आहे. तर पावसाळ्यात प्रक्रिया होत नाही. म्हणून हा प्रकल्प हा २७० दिवस कार्यान्वित राहिल.

७) **श्री परमेश्वर लक्ष्मण घळके, राहणार- आवरपिंपरी, तालुका- परंडा, जिल्हा- उस्मानाबादः-**

आसवणी प्रकल्पाचे विस्तारिकरण केल्यानंतर दररोज किती अल्कोहोलचे उत्पादन होईल?

विस्तारिकरण झाल्यानंतर प्रकल्पात ५९.० किलोलिटर अल्कोहोल दर दिवशी उत्पादन होईल.

८) **श्री सागर अंगद बुरंगे, राहणार-असू गाव, तालुका- परंडा, जिल्हा- उस्मानाबादः-**

या प्रकल्पात खत निर्मिती होणार आहे. तर त्यापासून किती गावांना व शेजारील गावांना काय फायदा होऊ शकतो?

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की हे खत शेतात वापरू शकता, त्यामुळे जमिनीचा पोत सुधारेल, आता सेंद्रीय खत वापरण्यास प्राधान्य देण्यात येते. फळबागेत वापरल्यास उत्पादनात वाढ होईल. यावेळी सद्स्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना खत किती प्रमाणात निर्माण होईल असे विचारले आहे. त्यावेळी पर्यावरण सल्लागार यांना उत्तर दिले की २५,००० टन प्रत्येक मोसमात खताची निर्मिती होईल. ते खत आपण घेऊन शेतात टाकू शकतात. त्याचप्रमाणे खत वापरल्याने केन पेमेंटही चांगले मिळेल.

९) **श्री शेखर बापु कुंभार, राहणार-मुगाव, तालुका — परांडा, जिल्हा-उस्मानाबादः-**

विस्तारिकरण प्रकल्पात ध्वनिप्रदूषणासाठी काय उपाययोजना करण्यात येणार आहेत?

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की या प्रकल्पात ध्वनि प्रदूषण हा मुख्य स्त्रोत नाही, कारण प्रकल्पात फिरणारी यंत्रे वा भाग जास्त नाहीत. कारखान्याच्या कंपाऊंड भिंतीच्या बाहेर आवाज जाणार नाही. प्रकल्पातील डी.जी. सेट्स साठी कनोपी व सायलेंसर सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येईल. प्रकल्पात फर्मेन्टेशन व डिस्टीलेशनमध्ये आणि बॉयलरमुळे ध्वनि प्रदूषण होईल व त्याठिकाणी आवाजाची पातळी ही ८०-८५ डेसिबल एवढी असेल. त्याठिकाणी काम करणा-या कामगारांना इअर प्लग्स, इअर मफ्स ही वैयक्तिक संरक्षणात्मक उपकरणे पुरविण्यात येतील.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सदरहू विस्तारिकरणाबाबत आलेल्या सूचनांचा ऊहापोह करताना सांगितले की दोन-तीन मुद्दे महत्वाचे वाटत असल्याने ते सागंतो. एक रेन वॉटरचा मुद्दा, दुसरा हरितपट्टा विकसित करण्याचा, तिसरा प्रदूषणबाबत मग ते वायूरुप किंवा द्रवरुप, आरोग्य शिबिर आयोजित करण्याची सूचना आहे. तरी ह्या मुद्यांबाबत सादरीकरणानंतर विवेचन करण्याच्या सूचना दिल्या.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की रेन वॉटर/पावसाचे पाणी अडवून ते प्रकल्पाच्या छतावरिल टाकीत साठवले जाईल. छतावरिल टाकीत १६,१५२.०४ घनमीटर एवढे पावसाचे पाणी साठवले जाईल. ते फायर फायटींग साठी वापरले जाईल. तर सरफेस हार्वेस्टिंगव्दारे (पृष्ठभागावरिल

साठवणूकीमुळे) ३९,५३१.१७ घनमीटर पाणी साठवण टाकीत साठवले जाईल. पाणी जमिनीत मुरल्याने भूजल पातळीमध्ये वाढ होईल.

प्रकल्पात कार्यरत असणा-यांसाठी आरोग्यशिबिर आपण आयोजित करतो. त्याचबरोबर आजूबाजूच्या गावातील लोकांसाठी करु शकतो. नियुक्त केलेले वैदकीय अधिकारी हे प्रकल्प स्थानावर येतील व गावकरी येथे येऊन वैदकीय सल्ला घेऊ शकतात किंवा एखाद्या ठिकाणी वैदकीय शिबिर आयोजित करता येईल.

हरित पट्ट्याविषयी पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की मागच्या वर्षी शासनाने पाच कोटी झाडे लावण्याचा संकल्प केलेले होता. त्यात प्रकल्पाचा सहभाग होता. ज्याप्रमाणे प्रकल्पात झाडे लावलेली आहेत, तशीच झाडे सभोवतालच्या गावात लावण्याचा कार्यक्रम हाती घेता येईल.

१०) **<u>डॉ. पी.एम.जोशी, सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती:-</u>**

डॉ. पी. एम. जोशी यांनी विचारले की सादरीकरणात आपण सांगितले की १० टनाचा कार्यरत असलेलाच बॉयलर आपण परत वापरणार आहात. तर ओसीएमएस व ऑनलाईन मॉनिटरिंगसाठी अतिरिक्त खर्च करण्याची गरज काय? पर्यावरण सल्लागार यांनी त्याची देखभालीसाठी खर्च करावा लागेल असे सांगितले. त्यावेळी सदस्य यांनी देखभाल हा पूर्णपणे वेगळा मुद्दा आहे असे सांगितले.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी येथे सांगितले की बैठकीत विस्तारिकरणासाठी किती गुंतवणूक करणार व सभासदांना त्याचा फटका बसेल काय अशी शंका उपस्थित करण्यात आलेली होती. तर १३ कोटींची गुंतवणूक ही पर्यावरण व्यवस्थापन योजना, विविध प्रदूषण नियंत्रण यंत्रे, त्यांची देखभाल, हरित पट्टा विकास इ. साठी आहे. ती नुसती प्रकल्प बांधकामासाठी नाही. प्रदूषण नियंत्रण व पर्यावरण संरक्षण हे अनिवार्य आहे. त्यामुळे या गुंतवणूकीमुळे फटका बसेल हे योग्य नाही, ती जबाबदारी आहे. आपण जुना ओसीएमएस वापरु शकता.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प प्रवर्तकांनी सर्व प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा पूर्णपण कार्यान्वित ठेवण्याची व त्यांच्या ऑपरेशन व देखभालीवर वेळोवेळी लक्ष देण्याची सूचना केली. म.प्र.नि. मंडळाच्या पाहणीत असे आढळले की काही उद्योग सीपीयु कार्यान्वित करत नाहीत. त्याचप्रमाणे म.प्र.नि.मंडळाने पारित केलेल्या संमतीपत्रातील सर्व अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक आहे.

प्रकल्प प्रवर्तक यांनी बैठकीत सांगितले की आमच्या प्रकल्पात साखर विभाग व आसवणी विभाग यात दोन सीपीयु कार्यान्वित आहेत. त्यामुळे आमची पाण्याची बचत चांगल्याप्रकारे झालेली आहे. ते पाणी आम्ही शेतीकरितासुध्दा वापरत असतो. त्याच्यावर आम्ही १६ एकर उसाचीही लागवड केलेली आहे.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी याबाबत प्रोत्साहन देताना सांगितले म.प्र.नि. मंडळाचे अध्यक्ष यांनी याबाबत लॉग बुक ठेवण्याची सूचना केलेली आहे.

ज्याप्रमाणे आपण बॉयलरबाबत सर्व नोंद घेतो, त्याचप्रमाणे सीपियुचे लॉग बुक, किती केमिकल्स लागले, वेगळी उर्जा मिटर्स लावण्याची सूचना, किती उर्जा वापरली याची माहिती उप प्रादेशिक कार्यालय, लातूर यांना वेळोवेळी कळविणे आवश्यक आहे.

बैठकीचा ऊहापोह करताना सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की उपस्थितांनी विस्तारिकरणामुळे रोजगाराची संधि, प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा व प्रकल्पात कच्चा माल मोलॅसिस ऐवजी दुसरे काही वापरता येईल काय याबाबत विचारणा केली. त्याचप्रमाणे हरितपट्ट्याबाबत विचारणा करताना किती झाडे लावली व किती लावणार याबाबत सविस्तर माहिती देण्याची सूचना केली. विस्तारित प्रकल्प किती दिवस चालेल व त्यात किती प्रमाणात अल्कोहोलची निर्मिती होईल, प्रकल्पास काय फायदा होणार असे प्रश्न विचारण्यात आले. उपस्थितांनी विषयास अनुसरुन प्रश्न विचारले आहेत. हे अतिशय स्तुत्य आहे. त्या प्रश्नांना प्रकल्प प्रवर्तक व पर्यावरण सल्लागार यांनी उत्तरे दिलेली आहेत.

त्यांनी सांगितले की बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली असून त्याचे इतिवृत्त इंग्रजी व मराठीत तयार करण्यात येईल. पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीचे अध्यक्ष यांच्या मान्यतेने सदरहू इतिवृत्त मराठी व इंग्रजीत अंतिम पर्यावरण आघात मुल्यांक अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना ह्या पर्यावरण व वातावरणीय मंत्रालय, महाराष्ट्र शासन्, मुंबई यांना सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समिती याबाबत योग्य तो निर्णय घेईल.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी माननीय अध्यक्षांच्या वतीने जनसुनावणी संपन्न झाल्याचे जाहिर केले.

शेवटी अध्यक्षांचे आभार मानुन जाहीर लोकसुनावणी संपन्न झाली.

सोबत प्राप्त झालेल्या लेखी सूचना ०३ जोडत आहे.

**(डॉ. पी. एम. जोशी)**
सदस्य, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी
तथा
प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, औरंगाबाद

**(शिवकुमार स्वामी)**
अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी
तथा
अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी, उस्मानाबाद

ADDITIONAL DISTRICT MAGISTRATE * Osmanabad *

**(व्ही. पी. शेळके)**
समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी
तथा
उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, लातूर.